Newspaper : Maharashtra Times

Article date : 22 August 2017

Post event article

# ॲपमय कॅम्पस झालं जी!

**दुहिता लिमये,** पोदार कॉलेज
muntainbox@gmail.com

व्हॉटसॲपवर भन्नाट डीपी ठेवत, इन्स्टाग्रामवर फोटो अपलोड करत, स्नॅपचॅटवर स्टोरी टाकत माटुंग्याच्या पोदार कॉलेजमध्ये एनिग्मा धुमधडाक्यात पार पडला. सुमारे ६० ते ७० इव्हेंट्सचा यात समावेश होता. या फेस्टमध्ये विविध ॲप्सच्या मदतीने मज्जा करायची होती. कारण थीम होती ॲपस्ट्रॅक. काल्पनिक विश्वात रममाण होणाऱ्या या पिढीला अगदी साजेशी अशी ही संकल्पना होती. संपूर्ण कॉलेज यादरम्यान ॲपमय झालं होतं. अशा या 'ॲप'फुल फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर होता. सहभागी झालेल्या कॉलेजांनासुद्धा विविध ॲप्सची नावं देण्यात आली होती. एवढंच नाही तर फेस्टमधील इव्हेंट्स हे ॲप संदर्भात होते. एनिग्मामध्ये 'पॉप इट अप', 'बॅटल ऑफ स्ट्रीट्स', 'वॉर ऑफ डीजे' यासारखे इव्हेंट्स चांगलेच गाजले. एनिग्माच्या अंतर्गत ऋतुरंग-उत्सव मायबोलीचा हा फेस्टदेखील साजरा करण्यात आला. यामध्ये 'मिस्टर अँड मिस ऋतुरंग', 'शोध खजिन्याचा' आणि 'कबड्डी' याने विशेष शोभा आणली. या सगळ्या इव्हेंट्सना विद्यार्थ्यांची उत्साहपूर्ण गर्दी पाहायला मिळाली. जवळजवळ ३० कॉलेजांनी यात सहभाग घेतला होता. एकंदरच काय तर मोठ्या जल्लोषात आणि विद्यार्थ्यांच्या उस्फूर्त प्रतिसादात फेस्ट चांगलाच रंगला.